भारतीय रिज़र्व बैंक
RESERVE BANK OF INDIA
www.rbi.org.in

आरबीआय/2013-14/526
डीजीबीए.सीडीडी.क्र.5342/15.02.001/2013-14 मार्च 21, 2014

अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक / व्यवस्थापकीय संचालक,
मुख्य कार्यालय, सरकारी लेखा विभाग - भारतीय स्टेट बँक / स्टेट बँक ऑफ बिकानेर अँड जयपुर /
स्टेट बँक ऑफ हैद्राबाद / स्टेट बँक ऑफ म्हैसूर, स्टेट बँक ऑफ पतियाला / स्टेट बँक ऑफ त्रावणकोर,
आंध्र बँक / अलाहाबाद बँक / बँक ऑफ बडोदा / बँक ऑफ इंडिया / बँक ऑफ महाराष्ट्र /
कॅनरा बँक / सेंट्रल बँक ऑफ इंडिया / कॉर्पोरेशन बँक / देना बँक / इंडियन बँक / इंडियन ओव्हरसीज बँक /
ओरिएंटल बँक ऑफ कॉमर्स / पंजाब नॅशनल बँक / पंजाब अँड सिंध बँक / सिंडिकेट बँक / युकोबँक /
युनियन बँक ऑफ इंडिया / युनायटेड बँक ऑफ इंडिया / विजया बँक/आयडीबीआय बँक लि. /
आयसीआयसीआय बँक लि.

महोदय/महोदया,

**सार्वजनिक भविष्यनिधी योजना, 1968 (पीपीएफ स्कीम, 1968) आणि ज्येष्ठ नागरिक बचत योजना, 2004 (एससीएसएस, 2004) - व्याजदरांमध्ये सुधारणा**

कृपया, लघु बचत योजनेवरील आमचे परिपत्रक आरबीआय /2011-12/359 दि. जानेवारी 20, 2012 चा संदर्भ घ्यावा. त्यात सांगण्यात आले होते की, लघु बचत योजनांवरील व्याजदरांवरील सरकारच्या निर्णयानुसार, प्रत्येक वित्तीय वर्षासाठीच्या निरनिराळ्या लघु बचत योजनांवरील व्याजदर, त्या वर्षाच्या 1 एप्रिल पूर्वी सरकारकडून अधिसूचित केले जातील

आता भारत सरकारने, त्यांच्या ऑफिस मेमोरँडम (ओएम) क्र. 6-1/2011-12 एनएस-2 दि. 4 मार्च 2014 अन्वये, वित्तीय वर्ष 2014-15 साठीचे, निरनिराळ्या लघुबचत योजनांवरील व्याजदर कळविले आहेत. त्यानुसार, 2014-15 ह्या वित्तीय वर्षासाठी 1 एप्रिल 2014 पासून, पीपीएफ 1968 व एससीएसएस 2004 वरील व्याजदर, चक्रवाढ व्याजाने/त्या योजनांमध्ये अंतर्भूत प्रदानांनुसार पुढीलप्रमाणे असतील :

| योजना | 1.4.2013 पासून लागु व्याजदर | 1.4.2014 पासून लागु व्याजदर |
|---|---|---|
| 5 वर्षे एससीएसएस, 2004 | द.सा. 9.2% | द.सा. 9.2% |
| पीपीएफ, 1968 | द.सा. 8.7% | द.सा. 8.7% |

ह्या परिपत्रकातील मजकुर, पीपीएफ 1968 व एससीएसएस 2004 योजना राबविणा-या आपल्या बँक शाखांच्या नजरेस आणावा. त्याचप्रमाणे, पीपीएफ 1968, व एससीएसएस, 2004 च्या वर्गणीदारांच्या माहितीसाठी, तो आपल्या शाखांच्या नोटिस बोर्डावरही प्रदर्शित केला जावा

आपला,
(श्रीकांत हमीये)
व्यवस्थापक

सरकारी व बँक खाती विभाग, केंद्रीय कार्यालय, मुंबई सेंट्रल स्टेशन समोर, भायखळा -मुंबई 400 008टेलिफोन : 022-2308 4121 फॅक्स : 022-2300 0370/2301 6072/2301 0095 ईमेल cgmicdgbaco@rbi.org.in

सावधानतेचा इशारा : बँक खात्याचा तपशील पासवर्ड ह्यासारखी वैय्यक्तिक माहिती मागविण्याबाबत, आरबीआय, कधीही ईमेल्स, एसएमएस पाठवत नाही किंवा फोन ही करत नाही. आरबीआय, कोणाचा निधी ठेवून घेत नाही किंवा देऊ करत नाही. प्रकारच्या कोणत्याही ऑफर्सना प्रतिसाद देऊ नका.